# सेवक वार्ता

फेब्रुवारी-२०२३

वर्ष -४, अंक-४

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, गोखले नगर, पुणे - ४११०१६

## सा.व. विभाग कामांचे मुल्यांकन कामाची सेवक संघास प्राप्ती

म. ग्रा. रो. ह. यो. द्वारा सामाजिक वनीकरण यंत्रणेने केलेल्या गट लागवड आणि बांधावरील लागवडडीच्या मूल्यांकनासाठी दरपत्रके स्वीकृत होवून सेवक संघास मिळाळे आहे. या मुल्यांकन कामासंबंधी सा. व. विभागाशी केलेल्या वाटाघाटीत श्री. पत्की , सावरकर व अस्थाना यांचा मोठा सभिाग होता. प्रधान मुख्य वन संरक्षक, सा.व. यांनी मूल्यांकनासाठी निवडलेल्या विभाग व परिक्षेत्रातील लाभार्थीची यादी पत्र क्र.कक्ष-२/योजना/प्र.क्र. ३/१४८२ /२०२२-२३,दि.१८-०१-२०२३ अन्वये पाठविली आहे. या यादी नुसार लाभार्थी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, परभणी, जालना सा.व. विभागातील आहेत. ज्या लाभार्थिंचे मूल्यांकन करणेचे आहे.त्याचा गोषवारा ...

विभाग -लाभार्थी -क्षेत्र हे. -रोपे
रत्नागिरी-३९ -२५.८२ - १२,५००
सिंधुदुर्ग -२६ -२८.१० - ८,१२५
परभणी -५० -४७.२२- ४८,२००
जालना -४९ -४६.५३ -२८,७२५
एकूण -१६४ -१४७.६७-९७,५५०

या मूल्यांकन कामाचे सुधारीत वाटप करण्यात आले आहे.

दि.१३-२-२०२३ च्या समझोता अभिलेखासोबत मूल्यांकन स्थळाच्या सुधारीत यादीनुसार मूल्यांकन कामाचे फेरवाटप करण्यात आले.

**विभाग रत्नागिरी-**

तालुका:खेड(६),२४०० रोपे व रत्नागिरी (१४),४८०० रोपे
मूल्यांकनकार: श्री.पी.के.कुलकर्णी.
देवरूख (४),८०० रोपे व राजापूर(१५),४५०० रोपे
मूल्यांकनकार: श्री.पी.ए.सुतळे

**विभाग सिंधुदुर्ग-**

सर्व तालुके(२६),८१२५ रोपे

**विभाग परभणी -**

सेलू-(१-१७),१८६०० रोपे
श्री. जी.के.निकम
सेलू-(१८-३४),१३२०० रोपे
श्री.बी.आर.छल्लारे.
मानवत-(१०),१०९०० रोपे
व गंगाखेड (६),५५०० रोपे
श्री.आर.टी.मोरे.

**विभाग जालना-**

परतुर (४९),२८७२५ रोपे
परतूर (१-१७) श्री.एस.के.गवळी
परतूर (१८-३३) श्री पी.एच. वाघ.
परतूर (३४-४९)श्री आर.जी. राणे

मग्रारोहयो मार्फत क्रुषी वानिकी कार्यक्रम सा.व.वि.ने गत ३ वर्षात राबविला आहे. त्याचे मूल्यांकन करण्याचे काम सेवक संघास मिळाले आहे. सुमारे ९७५५० रोपे,१६४ लाभार्थिंनी,९७.५५० हे. क्षेत्रावर लागवड केली आहे व त्याचे मूल्यांकन करणेचे आहे.

श्री. पत्की प्रकल्प समन्वयक असून त्यांनी गुगल फॉर्म व लिंक तयार करणे, डमी प्रात्यक्षिक इ.पूर्वतयारी केली आहे व १५ २२३ला गुगलमीट मध्ये मार्गदर्शन करणेत आले.

अध्यक्षांनी श्री अस्थाना यांना या मूल्यांकन प्रकल्पाचे चमू प्रमुख म्हणून निवड व नेमणुक केली आहे. श्री. पत्की यांनी त्यांचे अभिनंदन करत यापुढे मूल्यांकनकारांनी त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे कार्यरत असावे. त्यांना सामाजिक वनीकरण विभागात काम करण्याचा दीर्घ अनुभव लक्षात घेता, ते उत्तमरित्या अहवाल तयार करतील असा विश्वास व्यक्त केला. हे काम १९ फेब्रुवारी पासून सुरु करण्याचा आले आहे.

त्याची काही क्षण चित्रे









## पाणलोट क्षेत्र उपचार अंतर्गत मूल्यांकन काम पूर्ण

सेवक संघाचे जेष्ठ सदस्य व अनेक कामांचे समन्वयक, मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या प्रयत्नातून राज्यातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्र उपचार अंतर्गत - ६२९ हे. रोपवने २८ स्थळे, सामाजिक वनीकरण विभाग रस्ता दुतर्फा रोपवने -५२५ किमी. १७४ स्थळे , मृद-जल संधारण कामे - ९९ चे मूल्यांकन काम श्री. पत्की यांच्या देखरेखीत वेळेआधी पूर्ण झाले आहे. त्यात सर्वश्री एस. के. गवळी, जे.ए. पाटील, ए. एस. खुणे, एम. एस. पाटोळे, आर.जे. राणे, आर. एम. शास्त्री , एस. जी. पुराणिक, पी. ए. सुतळे, विवेक डावरे, बी. व्ही. सेलूकर, बी. आर. छल्लारे, बी. बी. जोमीवाले, पी. के. कुलकर्णी, उमेश धोपेश्वरकर,जी. के. निकम, आर. टी. मोरे, व्ही. आर. खनके, एस. ए. बत्तुलवार व पी. एच. वाघ सहभागी झाले होते. याकामी एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग इंस्टीट्यूट, पुणे यांचेव्दारा विकसित केलेली संगणकीय प्रणालीचा वापर करणेत आला. मुल्यांकन कामाची माहितीचे ऑनलाईन संकलन, करण्यात येवून पृथ्वकरणांती प्रारूप मुल्यांकन अहवाल लेखन करण्यात येत आहे. निष्कर्ष संगणकीय प्रणालीव्दारा करण्यात येईल.

---

## सेवक संघाची आमसभा अमरावती येथे संपन्न

सन २०२१-२२ ची सर्व साधारण वार्षिक सभा २० जानेवारी २३ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख प्रशासन व विकास प्रबोधिनी अमरावती विभाग, विद्यापीठ रोड अमरावती येथे श्री. शिरीश अस्थाना यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. कार्यक्रमास सर्वश्री. एन. रामबाबू, आयुक्त, राज्य लोक सेवा हक्क आयोग, अमरावती विभाग, जी. के. अनारसे, वन संरक्षक, अमरावती, अजय पांढरे, संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख प्रबोधिनी अमरावती, अमरावती हे मान्यवर उपस्थित होते.

### सन २०२३-२६ साठी सेवक संघाची नूतन केंद्रीय कार्यकारिणी खालीलप्रमाणे

निवडण्यात आली.

1.विश्वास सावरकर: अध्यक्ष
2.मदन कुलकर्णी:कार्यकारी अध्यक्ष
3.शिरीष अस्थाना:सचिव
4. संभाजी गवळी: उपाध्यक्ष -१
5.शिवाजी भगत: उपाध्यक्ष -२
6.उ.धोपेश्वरकर: कोषाध्यक्ष
7.प्रदीप कुलकर्णी: सह सचिव

वृत्त स्तरावरील सहअध्यक्ष हे सदस्य असतील.

### कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे होती

(१)सकाळी १०.०० ते १०.३० - पदाधिकारी परिचय व स्वागत.
(२) १०.३० ते १०.४५ - प्रास्ताविक - कार्यकारी अध्यक्ष -संघाची वाटचाल व नवीन संधी
(३) १०.४५ ते ११.१५ - सन २१-२२ खर्च मंजुरी व आर्थिक विश्लेषण - सचिव
(४) ११.१५ ते ११.३० - शाखा कार्य अहवाल २०२१-२२ - अमरावती, धुळे, पुणे, औरंगाबाद, नागपुर, चंद्रपूर
(५) ११.३० ते १२.१५ - सेवक संघ कार्य, जबाबदारी,पदाधिकारी निवड प्रक्रिया, शाखा पुनरुज्जीवन न होण्याची कारणे व त्यावर उपाय योजना, ठरविलेल्या उदिष्टपैकी किती व कोणते उद्दिष्ट साध्य झाले व जी उद्दिष्ट साध्य झाले नाही त्याची कारणे व त्यावरील उपाय योजना,
यावर मंथन
(६) १३.०० ते १४.०० - भोजन
(७) १४.०० ते १५.०० - दुपारचा कार्यक्रम - स्थानिक निवृत्त वन अधिकारी व कर्मचारी आणि

स्थानिक वन संरक्षक या पाहुण्यांचे स्वागत, परिचय व सेवक स्मृतिचिन्ह आणि औषधी वनस्पती प्रदान केल्या.

(८) १४.१५ ते १५.०० - सेवक संघ महाराष्ट्र व अमरावती शाखेचे कार्य परिचय - फोटो display सह. अमरावती शाखा सह अध्यक्ष श्री. संजय जगताप

(९) १५.०० ते १५.१५ -अध्यक्ष, श्री. शिरीष अस्थाना यांचे सेवक संघ महाराष्ट्र, वाटचाल बाबत संबोधन.

(१०) १५.१५ ते १५.३० - विशिष्ट व्यक्ती, संस्था यांचे विशिष्ट वन कार्याबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देवून सन्मान.

(११) १६.२५ ते १७.२५ - मान्यवरांचे संबोधन

(१२) १७.२५ ते १८.०० - आभार प्रदर्शन - सचिव अमरावती शाखा

(१३) १८.०० ते १८.१०- चहापान

## क्षणचित्रे ......














कार्यक्रमाचे उद्घाटन दीप प्रज्वलन













वार्षिक सर्व साधारण सभा



मान्यवरांचे स्वागत





श्री. अजय पांढरे, संचालक, प्रबोधिनी अमरावती



जी. के. अनारसे, वन संरक्षक



वन कार्याबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देवून सन्मान





श्री. व्ही. टी. पत्कींचे मार्गदर्शन

## कॅम्पा अंतर्गत मूल्यांकनाचे मानधनाचे वितरण

प्रजासत्ताक दिनाचे मुहुर्तावर सुरू करण्यात आलेले कॅम्पा अंतर्गत मूल्यांकन कामांच्या मानधनाचे व प्रवासखर्चाचे वाटप सर्व सदस्यांचे पूर्ण करणेत आले आहे. ही रक्कम रु. ४,१७,२०५ आहे.

## श्री. निकुमे सेवक सदस्यांचा आगळ्यावेगळ्या ७१ वा वाढदिवस पद्धतीने साजरा

दिनांक १९ फेब्रुवारी रोजी धुळे शाखेचे सदस्य श्री एन एम निकुमे धुळे शहरातील शासकीय विद्या निकेतन या शाळेत धुळे शाखेचे अध्यक्ष श्री. एस. के. गवळी यांच्यासमवेत शिवजयंती निमित्त कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्यांचे विशेष आमंत्रणावरून उपस्थित राहिले. विद्यार्थ्यांनी शिवजयंती साजरी करण्याचा एक भाग म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिवकालीन दहा किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार केल्या होत्या. या प्रतिकृतीमधून विद्यार्थ्यांची कलात्मकता व शिवजयंतीच्या संबंधात जो उत्साह दिसून आला त्याने प्रेरित होऊन श्री निकुमे यांनी प्रत्येक किल्ल्यासाठी १०१ रुपये याप्रमाणे १०१० रुपयाचे बक्षीस या बालमित्रांना प्रदान केले व आपला ७१ वा वाढदिवस आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केला.

सेवक संघाच्या धुळे शाखेमध्ये कलागुणांची कदर करणारे असे सदस्य आहेत, याबद्दल त्याचा सेवक संघाला व विशेषता धुळे शाखेला सार्थ अभिमान आहे.

## सेवक संघाचे मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या बैठकीचा वृत्तांत

फेब्रुवारी महिन्यात मासिक बैठक झाली नाही.

## पृथ्वीचे दुःख

कवि - डॉ. शेषराव पाटील

खूप झाले आता मला सहन होत नाही
अधिकचा आभार आता ग्रहण होत नाही
झटकू जरा अंग होईल थोडीफार पडझड
होईल काही ठिकाणी माणसांची रडारड
होऊ दे एकदाची थोडीशी गडबड
दुसरं तरी काय करू थांबवण्या माझी परवड
माय ना मी तुमची किती मला छळणार
माझे दुःख तुम्हाला कधी रे कळणार
कारखाने तुमचे रात्र दिवस जळणार
अंगावरचं बर्फ माझे नाही हा वितळणार
विरळ झाली वस्त्रे माझी कधी होणार नवी
निळी शालही पक्षांच्या नक्षीची मज हवी.

## रान भाज्या

आवडती मज रानभाज्या
खाण्यात या और मजा
काही आजारांवर औषध
काही असती शक्तिवर्धक
अनेकविध भाज्यांचे प्रकार
काही करती रोगप्रतिकार
पावसाळ्यात रान तरोटा
भाजीस या नाही तोटा
बांधावरती शतावरीचे थोंब
आवडती मला याचे कोंब
कधी खाव्या आबई शेंगा
हव्या मात्र त्या कोवळ्या ताज्या
नदीकाठचे छोटे उंबर
झाडावरती त्यांचे झुंबर
श्रावणातील फळ वाघाटे
वेलांना या असती काटे
श्रावणात मानाचे स्थान
शोधून ठेवा मिळायचे ठिकाण
आवडती मज रान तोंडली
थोडी कडवट परंतु चांगली
फांग पाने अन समुद्र शोख
भाज्यांचा या ठेवा शोक

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी